दै.दिव्य मराठी

# 'चला वाचुया, स्वतःला घडवुया'चा संकल्प करावा

## प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे यांचे आवाहन

**शहर प्रतिनिधी** | पाथर्डी

वाचन ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून वाचनाने मनुष्याच्या व्यक्तीमत्वात प्रचंड बदल होतो. पुस्तके प्रेरणा तर देतातच परंतु ती खरी ज्ञानाची स्त्रोत आहेत. इलेक्ट्रॉनिक माध्यमे, इंटरनेट व मोबाइलच्या अतिवापरामुळे वाचन कमी होत असून वाचनसंस्कृती हरवत चालली आहे. आज मुले ई-बुक वाचन करतात, हा दावा केला जातो. परंतु त्यात तथ्य नसून छापील पुस्तके वाचनात जो आनंद आहे, तो ई बूकमध्ये नाही. म्हणून आजपासून प्रत्येकाने चला वाचूया, स्वतःला घडवूया, असा संकल्प करावा, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे यांनी केले.



माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंत्ती कार्यक्रमात बाबुजी आव्हाड महाविद्यालयातील प्राध्यापक. छाया : नितीन गटाणी.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त स्व.बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या ग्रंथालयात आयोजित वाचन प्रेरणा दिनानिमित्त ते बोलत होते.यावेळी ग्रंथपाल प्रा. किरण गुलदगड, डॉ. बबन चौरे, डॉ. अजयकुमार पालवे, प्रा.मन्सूर शेख, प्रा. दत्तप्रसाद पालवे, डॉ. अभिमन्यू ढोरमारे आदी उपस्थित होते. डॉ. ढाकणे म्हणाले, प्रत्येक शाळेमधून मुलांना दररोज एक तास मुक्तपणे वाचन करण्याचा आनंद मिळावा. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तके मिळावीत.प्रत्येक शाळा, महविद्यालयात पुस्तक प्रदर्शन आयोजित करणे, लेखकांची व्याख्याने, मुलाखती आयोजित करणे, त्यांना बोलते करणे गरजेचे आहे. अब्दूल कलामांची विचारसरणी, त्यांचे कार्य महान आहे, असे त्यांनी सांगितले.